त्वरि...
****

५ कोटे/एकत्रीकरण ३० - ५७-८८
पुणे
(३८०)

१६ MAY 1988

उपसंचालक भूमि अभिलेख,
मुंबई/नागपूर/औरंगाबाद/पुणे/नाशिक व अमरावती.

विषय :- जमीन एकत्रीकरण योजना.
---
का. क. ३२[१] अन्वये कार्यान्वित झालेल्या
दुरुस्ती योजनांचे अनुसरण कामाबद्दल.

या कार्यालयाकडून उपसंचालक भूमि अभिलेख यांचे कार्यालयाचे दरवर्षी वार्षिक निरीक्षण केले जाते असे निरीक्षणानंतर असे आढळून आले ब-याचशा प्रमाणांत दुरुस्ती योजनांचे अनुसरण काम शिल्लक असून हे काम वर्षानुवर्षे शिल्लक असून त्यावर नियंत्रण नसलेचे आढळून आले आणि हे काम ज्या त्या वेळेस न झालेने ब-याचशा तक्रारी उदभाल्या आहेत. यामधे असेही निदर्शनास आले आहे की, दुरुस्ती योजनेप्रमाणे अधिकार अभिलेखा तदरी नोंद घेतली जाते. परंतु एवढयावर भागून चालणार नाही कारण दुरुस्ती न झालेस जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेखा यांचेकडे हद्दी दाखविणेसाठी अर्ज प्राप्त झालेस भूमापक/ भूकरमापकाना हद्दी दाखविणे कठीण जाते. त्याच प्रमाणे क. जा. प. न केलेने आकारबंद दुरुस्त करता येत नाही. तेंव्हा प्रत्येक प्रकारचे विहित केलेले अनुसरण काम वेळेच पाहिले आणि तसे न झालेस तक्रारीस वाव मिळतो आणि अभिलेखा दुरुस्त न झालेने पुढील कामावर त्याचा विपरीत परिणाम होतो. शिल्लक अनुसरण काम त्वरीत पूर्ण करणेचे दृष्टीने निरीक्षण ज्ञापांत जरुर त्या सुचना दिलेल्या आहेतच तथापि हे काम ३ महिन्याचे आंत पूर्ण करणेचे असलेने एकत्रीकरण अधिकारी यांचेकडून कालबध्द कार्यक्रम आखून घ्यावा आणि त्यांस अनुसरुण शिलकी काम ३ महिन्याचे आंतपूर्ण करून घ्यावे. स. ए. अ. कार्यालयातील कर्मचा-यांकडून हे काम पूर्ण करुन घ्यावे आणि तीन महिन्याचा कालावधी संपल्यावर उपसंचालक भूमि अभिलेख यांनी प्रगतिचा अहवाल सादर करावा शिलकी अनुसरण काम ३ महिनेच्या आंत पूर्ण झाले नसलेचे आढळून आल्यास संबंधित अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंग कारवाई केली जाईल याची सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी/एकत्रीकरण अधिकारी यांना समज देणेत यावी.

सही प्र. मा. ज. आ. पुणे
यांची स्वाक्षरी असे.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख [म. रा.] पुणे यांचेकरिता

प्रत :- एकत्रीकरण अधिकारी [सर्व]/सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी [सर्व] यांना त्वरीत कार्यवाहीसाठी व अहवाल सादर करणेसाठी रवाना.
प्रत :- जमाबंदी आयुक्त कार्यालयातील कार्यासन अधिकारी क-१ ते क-७ यांना माहितीसाठी रवाना.
मोरे १५५/-